(महाराष्ट्र शासनाने वर्षे १९८९ मध्ये स्थापिलेले)
(Established by Government of Maharashtra in the year 1989)

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक
*Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik*

ज्ञानगंगा घरोघरी

## व्यवस्थापन मंडळ बैठक
**Meeting of the Board of Management**

## कार्यवृत्त
**Mminutes of Meeting**

**बैठक क्रमांक** : 187
(Meeting Number)

**स्थळ** : व्यवस्थापन मंडळ सभागृह,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ,
नाशिक ४२२२२२

**Venue** : Board of Management Meeting Hall
Yashwantrao Chavan Maharashtra Open, University,
Nashik, 422 222

**वार व दिनांक** : गुरूवार, दिनांक 30 मार्च 2023
**(Day and Date )** गुरूवार, 30th March 2023

**वेळ** (Time) : दुपारी १२ वाजता (12 Noon )

आस्थापना कक्ष
आ.क्र.: 747
दिनांक : 20 | 4 | 2023

# यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

(महाराष्ट्र शासनाने वर्षे 1989 मध्ये स्थापिलेले)

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाची बैठक क्र.187 सोमवार दिनांक 30 मार्च 2023 दुपारी 12.00 वाजता विद्यापीठ मुख्यालयातील सभागृह, नाशिक येथे आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील सदस्य उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 01.डॉ.पी.जी.पाटील, कुलगुरू | | अध्यक्ष |
| 02.प्रा. महेंद्र लामा, नवी दिल्ली | | सदस्य |
| 03. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई (यांचे प्रतिनिधी – श्री. ज्ञानेश्वर नाठे) | (Online) | सदस्य |
| 04. डॉ. हरिहर कौसडीकर,सचिव, कृषी विभाग यांचे प्रतिनिधी | (Online) | सदस्य |
| 05.डॉ.अनिल कुलकर्णी,पुणे | | सदस्य |
| 06. श्री.उदित सेठ, मुंबई | (Online) | सदस्य |
| 07. आमदार श्रीमती सरोज आहिरे,नाशिक | | सदस्य |
| 08. डॉ.संजय चोरडिया, पुणे | (Online) | सदस्य |
| 09. डॉ.जयदीप निकम, संचालक, निरंतर शिक्षण विद्याशाखा | | सदस्य |
| 10. श्री. भटूप्रसादपाटील, कुलसचिव | | सचिव |
| 11. डॉ. गोविंदकतलाकुटे, वित्त अधिकारी | | निमंत्रित सदस्य |

**खालील सदस्यांची अनुपस्थिती मान्य करण्यात आली.**

| | |
|---|---|
| 12. सचिव, उच्च व तंत्रशिक्षण, मुंबई | सदस्य |
| 13. सचिव, उद्योग, मुंबई | सदस्य |
| 14. संचालक, उच्च शिक्षण, पुणे | सदस्य |
| 15. प्रा.डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | सदस्य |
| 16. श्री. विलास शिंदे, नाशिक | सदस्य |
| 17. डॉ. सत्यकामा, प्र कुलगुरू, इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली | सदस्य |
| 18. श्री. वि.अ.दळवी, संचालक, व्यावसायिक शिक्षण व प्रशिक्षण मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| 19. आमदार श्री. सुहास कांदे, नाशिक | सदस्य |

| **विषय क्र.** | **उपविषय ठराव क्र** | **तपशील** |
|---|---|---|
| 187.1.0 | 187.1.1 | **स्वागत** (Welcome) |
| 187.2.0 | 187.2.1 | दिनांक 29 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या 184 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव -** दिनांक 29 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या 184 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले तसेच प्रो. डॉ. महेंद्र लामा यांनी NEP 2020 च्या बैठक व अहवालाबाबत माहिती विचारली असता त्यांच्या सूचनेनुसार दि. 18 एप्रिल 2023 रोजी NEP2020 संदर्भात बैठक आयोजित करणेचे निश्चित करण्यात आले. |
| | 187.2.2 | दिनांक 19 ऑक्टोबर 2022 रोजी (By Circulation) द्वारे झालेल्या 185 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे. |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव - दिनांक** 19 ऑक्टोबर 2022 रोजी (By Circulation) द्वारे झालेल्या 185 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |

| | | |
|---|---|---|
| | 187.2.3 | दिनांक 22 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 186 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांच्या एकत्रित बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करणे |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव -** 22 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 186 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद यांच्या एकत्रित बैठकीचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आले. |
| | 187.2.4 | दिनांक 29 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या 184 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 29 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या 184 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| | 187.2.5 | दिनांक 19 ऑक्टोबर 2022 रोजी (By Circulation) द्वारे झालेल्या 185 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** - दिनांक 19 ऑक्टोबर 2022 रोजी (By Circulation) द्वारे झालेल्या 185 व्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| | 187.2.6 | दिनांक 22 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 186 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाहीचा अहवाल |
| | | **व्यवस्थापन मंडळ ठराव** दिनांक 22 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या 186 व्या व्यवस्थापन मंडळ व विद्वत परिषद बैठकीतील झालेल्या निर्णयावरील कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. |
| | | **सखोल चर्चेचे विषय** |
| 187.3.0 | 187.3.1<br>विद्यापीठ संशोधन समिती | **विद्यापीठ संशोधन समितीसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता मिळणेबाबत...**<br>**[टिपणी** – शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये विद्यापीठात संशोधनासंदर्भात विविध कृती (कृतींची यादी सोबत जोडली आहे) करावयाच्या आहेत. त्या कृती करण्याकरिता अंदाजे रु. 60,00,000/- इतका खर्च अपेक्षित आहे. विद्यापीठ संशोधन समिती सचिवांना कामास व त्याकरिता स्वतंत्र लेखाशीर्ष करून सन 2023-24 च्या आर्थिक अर्थसंकल्पात तरतूद करण्यास मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर... ]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – विद्यापीठ संशोधन समिती करिता स्वतंत्र लेखाशीर्ष व या लेखाशीर्षासाठी आर्थिक वर्ष 2023-24 च्या अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देण्यात आली. |
| | 187.3.2<br>ट्रेनिंग ॲण्ड प्लेसमेंट | **विद्यापीठात Training And Placement Expenditure हे नव्याने लेखाशिर्ष तयार करून त्यास तरतूद उपलब्ध करण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर**<br>**[टिपणी** - विद्यापीठाचे Training And Placement हे कार्यालय नव्याने सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयामार्फत विद्यापीठात बैठकांसाठी निमंत्रित तज्ञ (Industry Experts व TPO) यांच्या बैठका, महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेरील काही Placement आणि ट्रेनिंग या अनुषंगाने येणारी सर्व कामे त्यासाठी येणाऱ्या वित्तीय बाबी करण्यासाठी लेखाशिर्षात तरतूद असणे आवश्यक असल्याने Training And Placement Expenditure करिता लेखाशिर्ष उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर मंजुरीस्तव सादर....]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – विद्यापीठ Training And Placement Expenditure करिता स्वतंत्र लेखाशीर्ष व या लेखाशीर्षासाठी आर्थिक वर्ष 2023-24 च्या अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देण्यात आली. |
| | 187.3.3<br>सभा व दप्तर कक्ष | **मा. कुलगुरू यांनी विद्यापीठातील विद्याशाखेतील चार शिक्षकांचे विद्वत परिषदेवर नामनिर्देशन केलेल्या सदस्यांची नावे व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...**<br>**[टिपणी** : विद्वत परिषद विद्यापीठ परिनियम क्रमांक 5(1/1992) see statute 8(a) of the Act 3(iv) ) not more than (4) teachers other than Directors of the Schools of Studies to be nominated by the Board of Management on the recommendations of the Vice-Chancellor.<br>1. डॉ. संजिवनी महाले, प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>2. श्री. राजेंद्र वाघ, सहयोगी प्राध्यापक, कृषी विज्ञान विद्याशाखा |

| | | |
|---|---|---|
| | | 3. डॉ. दयाराम पवार, सहायक प्राध्यापक, शिक्षणशास्त्र विद्याशाखा<br>4. डॉ. अभय पाटील, सहायक प्राध्यापक, आरोग्य विज्ञान विद्याशाखा<br>मा. कुलगुरू यांनी विद्वत परिषदेवर नामनिर्देशित केलेल्या 4 शिक्षकांची नावे व्यवस्थापन मंडळासमोर मंजुरीस्तव सादर...]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - मा. कुलगुरू यांनी नामनिर्देशित केलेल्या विद्यापीठातील प्रस्तावित चार शिक्षकांच्या नामनिर्देशनास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 187.3.4<br>सभा व दप्तर कक्ष | **नियोजन मंडळावर डॉ. डी. आर.नंदनवार यांच्या नावास मान्यता मिळणेबाबत...**<br>**[टिपणी :** नियोजन मंडळावर विद्यापीठ परिनियम क्रमांक 3(1/1992) मधील sub-section(2) of section 18 of the Act च्या 3(iv) अन्वये तीन सदस्यांची नेमणूक व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने करावयाची आहे. तीन पैकी 2 सदस्यांची नेमणूक झालेली आहे. एका रिक्त जागेसाठी Technical and Vocational Education मधून नामनिर्देशित डॉ. डी.आर. नंदनवार, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या नावास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर सादर......]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - नियोजन मंडळावर विद्यापीठ परिनियम क्रमांक 3(1/1992) मधील sub-section(2) of section 18 of the Act च्या 3(iv) अन्वये नामनिर्देशित डॉ. डी.आर. नंदनवार, सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांच्या नावास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 187.3.5<br>दृक-श्राव्य केंद्र | **दृक-श्राव्य केंद्रातील उपकरणे निर्लेखित करणेबाबतच्या कार्यपद्धतीचा प्रस्ताव निर्णयार्थ सादर...**<br>**[टिपणी** – दृक श्राव्य केंद्राच्या स्थापनेपासून Analog Linear एडिटिंग सिस्टीम, A to D Compressed Video Non-Linear System, A to D Un-Compressed Video Non-Linear ही उपकरणे दृकश्राव्य केंद्राने गरजेप्रमाणे आणि त्या त्या काळाला अनुरूप खरेदी करून वापरली आहेत. तसेच त्यांचे काम करण्याचे आयुष्य संपले असून या उपकरणांना त्यांच्या उत्पादकाकडूनही तांत्रिक सहाय्य आणि सुटे भाग मिळणे बऱ्याच वर्षांपासून बंद झाले आहे. गेल्या काही वर्षांपासून दृक श्राव्य माध्यमात खूप मोठ्या प्रमाणावर बदल झाले आणि या बदलांमुळे जस जसा काळ पुढे गेला तस तशी ही उपकरणे वापरातून बाद (Technically Obsolete) होत गेली ही सर्व उपकरणे दृकश्राव्य केंद्रातील खोल्यांमध्ये साठवून ठेवली आहेत. ही सर्व उपकरणे दृकश्राव्य केंद्राच्या साठवण पुस्तिकेतून Write Off करणे आवश्यक आहे. दि. 29 ऑगस्ट 2022 च्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील ठराव क्र. 184.3.2 नुसार दृकश्राव्य केंद्रातील उपकरणे निर्लेखित करण्याचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेसाठी सादर...]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – दृक-श्राव्य केंद्रातील उपकरणांचे निर्लेखन संगणक केंद्रातील उपकरणांचा निर्लेखन कार्यपद्धतीनुसार करावे अशी चर्चा झाली. परंतू दि. 29 ऑगस्ट 2022 च्या व्यवस्थापन मंडळ बैठकीतील ठराव क्र. 184.3.2 नुसार संगणक केंद्रातील उपकरण निर्लेखन करतांना ग्रीन सर्टीफिकेट एजन्सीमर्फत निर्लेखन करावे, तसेच निर्लेखनसाठी समितीचे गठण करून त्यात पुढील व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यता घेवून निर्लेखनाची विहित कार्यवाही करावी असे निर्देशित केलेले होते. त्यानुसार संगणक केंद्रातील उपकरणांचा निर्लेखनासाठी खालीलप्रमाणे समितीचे गठण करण्यात आलेले आहे.<br>1.मा. कुलसचिव<br>2. मा. वित्त अधिकारी<br>3. अंतर्गत तांत्रिक तज्ञ व्यक्ती 1 किंवा 2 (मा. कुलगुरू नियुक्त विद्याशाखा संचालक/विभागप्रमुख)<br>4. बहिस्थ तांत्रिक तज्ञ व्यक्ती (संगणक / इंजिनियरिंग/माहिती व तंत्रज्ञान क्षेत्रातील व्यक्ती)<br>5. पध्दती अभियंता (हार्डवेअर)<br>6 नेट वर्क इंजिनियर (हार्डवेअर)<br>वरीलप्रमाणे समिती गठणास व संगणक केंद्राने दि. 21.06.2022 च्या प्रस्तावात निर्लेखनासाठी नमुद केलेल्या कार्यपध्दतीस सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>संगणक केंद्रातील निर्लेखनाच्या कार्यपध्दतीनुसार दृकश्राव्य केंद्र व इतर विभागात असलेले उपकरणांचे निर्लेखन करावे, त्याकरीता समितीत संबंधित विभागप्रमुख अथवा त्यांच्या प्रतिनिधीचा समावेश करून निर्लेखनाची कार्यवाही करावी असे सर्वानुमते ठरले. |

187.3.6
आस्थापना कक्ष

**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संगणक केंद्रातील तांत्रिक पदांना पदोन्नतीच्या स्टॅट्युट बाबत...**

**[टिपणी** – संगणक केंद्रातील कार्यरत अधिकारी यांचे पदोन्नती करीता Statute तयार करण्यासाठी मा. कुलगुरूंच्या मान्यतेनुसार स्थापन केलेल्या त्रिसदस्यीय समितीने सादर केलेला अहवाल दि. 29 ऑगस्ट 2022 रोजी झालेल्या व्यवस्थापन मंडळापुढे विषय क्र. 184.3.3 नुसार सादर केला होता. त्यात झालेल्या ठरावानुसार सदर शिफारशी सर्व् व्यवस्थापन मंडळ सदस्यांना पाठविण्यात आल्या तसेच शैक्षणिक पात्रतेबाबतची माहिती संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांचेकडून तपासून घेण्यासाठी पाठविण्यात आली होती. त्यांनी पाठविलेल्या अहवालाची प्रत व शिफारशी व्यवस्थापन मंडळापुढे निर्णयार्थ सादर....]

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या संगणक केंद्रातील तांत्रिक पदांच्या परिनियमाचा मसुद्यामध्ये संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांनी कळविलेल्या शैक्षणिक पात्रतेची व इतर सदस्यांनी केलेल्या सूचनांचे समावेश असलेल्या परिनियमाच्या मसुद्याची नोंद व्यवस्थापन मंडळातील सदस्यांनी घेतली. सदर परिनियम मसुद्यास महामाहिम राज्यपाल यांचेकडे विहीत नमुन्यात मान्यतेसाठी पाठविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

187.3.7
विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्र

**बाबुराव बागुल कथा पुरस्कार सन 2019 व 2020 वितरण करणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे सादर...**

**[टिपणी** - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण व बहि:शाल केंद्रामार्फत जेष्ठ साहित्यिक बाबुराव बागुल यांच्या नावाने नवोदित कथा लेखकांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यांच्या प्रथम कथा संग्रहाला बाबुराव बागुल कथा पुरस्कार देण्यात येतो. त्यानुसार सन 2019 व 2020 या वर्षी निवड झालेल्या प्रथम कथासंग्रहाचा तपशील खालील प्रमाणे..

**निवड समितीमार्फत निवडण्यात आलेले कथासंग्रह**

| क्र. | वर्ष | कथा लेखकाचे नाव | कथासंग्रहाचे नाव |
|---|---|---|---|
| 1 | 2019 | श्री. किरण येले | "मोराची बायको" |
| 2 | 2020 | श्री. बालाजी सुतार | "दोन शतकांच्या सांध्यावरच्या नोंदी" |
| रुपये 21,000/- रोख, स्मृतिचिन्ह व सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे | | | |

वरील कथासंग्रहाला पुरस्कार देण्याचा प्रस्ताव मान्यता मिळणेसाठी व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर...]

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - सन 2019 व 2020 या दोन वर्षाच्या बाबुराव बागुल कथा पुरस्कार वितरण करण्याच्या प्रस्तावित कथासंग्रहास व निवड समितीच्या शिफारशीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली तसेच यापुढे पुरस्कार त्या त्या वर्षात देण्यात यावे याद्दष्टीने कार्यवाही करावी असे सूचविण्यात आले.

187.3.8
आस्थापना कक्ष

**विद्यापीठाच्या कृषी विज्ञान केंद्रातील Senior Scientist cum Head/Training Organiser – KVK या पदाचे नियुक्तीबाबत..**

**[टिपणी** – कृषी विज्ञान केंद्रातील Senior Scientist cum Head/Training Organiser-KVK हे पद भारतीय कृषि अनुसंधान केंद्र् (ICAR) ने तातडीने भरण्याचे निर्देशित केल्याने दि.15.07.2022 रोजी सदर पदाची जाहीरात प्रसिद्ध करून निवड प्रक्रिया राबविण्यात आली. निवड समितीने शिफारस केलेल्या श्री. नितिन जयसिंग ठोके या उमेदवाराची निवड करण्यात आली.

Senior Scientist cum Head/Training Organiser-KVK या पदाच्या निवड समितीने नियुक्तीसाठी केलेल्या शिफारशीनुसार डॉ. नितीन जयसिंग ठोके यांची मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये केलेली नियुक्ती मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...]

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – Senior Scientist cum Head/Training Organiser-KVK या पदाच्या निवड समितीने नियुक्तीसाठी केलेल्या शिफारशीनुसार डॉ. नितीन जयसिंग ठोके यांची मा. कुलगुरूंच्या आदेशान्वये केलेली नियुक्तीची नोंद घेऊन कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

187.3.9
आस्थापना कक्ष

**विद्यापीठातील गट – अ संवर्गातील तदर्थ पदोन्नतीबाबत...**

**[टिपणी** – मा. व्यवस्थापन मंडळाने ठराव क्र. 178.3.9 दिनांक 7 ऑगस्ट 2021 नुसार विद्यापीठातील गट अ संवर्गातील तदर्थ पद्दोन्नतीस मान्यता दिली होती. त्यानुसार दिनांक 17 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या बैठकीत खातेंतर्गत पदोन्ती समितीने गट 'अ' मधील सरळसेवेच्या उपकुलसचिव

| | | |
|---|---|---|
| | | पदाच्या तदर्थ पदोन्नतीसाठी शिफारस केली आहे. सदर शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** दिनांक 17 फेब्रुवारी 2023 रोजी झालेल्या बैठकीत खातेंतर्गत पदोन्नती समितीने गट 'अ' मधील सरळसेवेच्या उपकुलसचिव पदाच्या तदर्थ पदोन्नतीच्या शिफारशीची नोंद घेऊन कार्योत्तर मान्यता देण्यात आली. |
| | 187.3.10<br>आस्थापना कक्ष | **दृक-श्राव्य केंद्रातील पदांच्या परिनियम (Statues) बाबत...**<br>**[टिपणी** - दृक-श्राव्य केंद्रातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती, शैक्षणिक पात्रता, कर्तव्य, पदोन्नतीच्या संधी याबाबतचा मसुदा कायद्यास महामहिम राज्यपाल यांनी संमती दिल्याची बाब मा. व्यवस्थापन मंडळास अवगत करण्यासाठी तसेच सदर परिनियमानुसार कार्यवाही करण्यासाठीचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर...]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – महामहिम राज्यपाल यांनी दृक-श्राव्य केंद्राच्या पदांच्या परिनियमास दिलेल्या मान्यतेची नोंद घेण्यात आली व परिनियमानुसार विहित पध्दतीने आवश्यक त्या शासननिर्णयांचा अवलंब करून पदोन्नतीबाबत कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. |
| | 187.3.11<br>आस्थापना कक्ष | **श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे, स्वीय सहायक (विवक्षित) यांना दिलेल्या मुदतवाढीबाबत...**<br>**[टिपणी** –मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे हे माहे फेब्रुवारी 2020 मध्ये निवृत्त झाले आहेत. स्वीय सहायक पदावर नियमीत व्यक्तीची नियुक्ती अद्याप झालेली नाही. स्वीय सहायक (विवक्षित) या पदावर सध्या करारावर श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे हे काम करीत आहेत. श्री. हिरे यांची विद्यापीठ परिनियम क्र. 11 (2 of 1993) नुसार मा. कुलगुरू यांच्या अधिकारात 2 वर्षांसाठी नियुक्ती देण्यात आली होती. मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या अधीन राहून श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे यांना पुढील एक वर्षासाठी नियुक्ती केली असुन सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** मा. कुलगुरू यांनी मा. व्यवस्थापन मंडळाच्या अधीन राहून श्री. राजेंद्र त्र्यंबक हिरे यांना पुढील एक वर्षासाठी केलेल्या नियुक्तीची नोंद घेऊन कार्योत्तर मान्यता देण्यात आली. श्री. हिरे यांची एक वर्षाची मुदतवाढ संपुष्टात येणे किंवा सदर नियमित पद भरले जाणे, यापैकी, जे आधी घडेल तोपर्यंत नियुक्ती देण्यात यावी अशी शिफारस करण्यात आली. |
| | 187.3.12<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांना ग्रामीण परिक्षेत्रासाठी शासन तरतूदीप्रमाणे घरभाडे भत्ता लागू करणेबाबत...**<br>**[टिपणी** – विद्यापीठाचे मुख्यालय हे सन 1994 पूर्वी नाशिक शहरात होते, मात्र विद्यापीठाचा वाढता विस्तार लक्षात घेता शासनाने विद्यापीठास नाशिक शहरालगत गोवर्धन ता. जि. नाशिक – 422 222 येथे भूखंड उपलब्ध करून दिल्याने मुख्यालय हे ग्रामीण क्षेत्रात आले. गोवर्धन गाव व नाशिक शहर हे लगतच आहे. विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी यांना गोवर्धन येथे राहण्याची सोय नसल्याने विद्यापीठ कर्मचारी नाशिक शहरातच वास्तव्यास आहेत ही बाब विचारात घेऊन मा. व्यवस्थापन मंडळाने दि. 6 नोव्हेंबर 2009 च्या बैठकीतील ठराव क्र. ए-100/09/95 अन्वये नाशिक शहरासाठी लागू असलेल्या घरभाडे दराप्रमाणे विद्यापीठ अधिकारी व कर्मचारी यांना घरभाडे भत्ता अदा करण्यास मान्यता दिलेली आहे. मा. प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी दिनांक 2.2.2023 च्या पत्रानुसार विद्यापीठ ग्रामीण क्षेत्रात असल्याचे नमूद करून ग्रामीण परिक्षेत्रासाठी असलेल्या शासन तरतूदीप्रमाणे घरभाडे भत्ता अदा करण्याचे कळविले आहे.<br>मा. प्र. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र व त्याअनुषंगाने कार्यवाही करणेबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे विचारार्थ सादर....]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – या संदर्भामध्ये खालीलप्रमाणे सविस्तर चर्चा होवून ठराव करण्यात आला.<br>शासनाने स्वतंत्र विद्यापीठ कायद्यानुसार यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाची स्थापना नाशिक शहरात केलेली आहे. सदर विद्यापीठ नाशिक शहरात पाच वर्ष कार्यरत होते. परंतु नाशिक शहरात विद्यापीठास देण्याजोगी आवश्यक तेवढी जागा उपलब्ध नसल्याने शासनाने शहरालगत गोवर्धन शिवारात विद्यापीठास जागा उपलब्ध करून दिली आहे. विद्यापीठास शासनाकडून अनुदान मंजुर होत नाही. तसेच शासनाने विद्यापीठातील कर्मचाऱ्यांना निवास व्यवस्थेसाठी कोणतेही अनुदान दिलेले नाही त्यामुळे विद्यापीठात शासनाच्या अनुदानातून निवासस्थाने उपलब्ध झालेली नाहीत. विद्यापीठानेही कर्मचाऱ्यांसाठी निवास व्यवस्था उपलब्ध करून दिली नसल्याने विद्यापीठातील सर्व कर्मचारी हे नाशिक |

शहरात वास्तव्यास आहेत. सर्व कर्मचाऱ्यांना पूर्वीपासून शहरीकरणाच्या दराने घरभाडेभत्ता अदा करण्यात येत आहे. केंद्रशासनाने प्रसिध्द केलेल्या सेन्सेक्सप्रमाणे शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, कॅन्टोनमेंट बोर्ड, व इतर प्रकल्प ज्यांना शहरात जागा उपलब्ध करून देणे शक्य नाही अशा विविध अस्थापनेकरिता शहरालगत 25 कि.मी. अंतरापर्यंत शहरीकरण गृहित धरावे व त्याप्रमाणे निवास भाडेभत्ता अदा करण्यात यावा असे नियम उपलब्ध आहेत. तसेच याअनुषंगाने शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या खालील शासन निर्णयावर सविस्तर चर्चा झाली.

01 शासन निर्णय क्र. घभाभ-1003/प्र.क्र45/सेवा-5 (स्पष्टीकरण) दि. 10 नोव्हेंबर 2003

02 शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. घभाभ-1098/प्रक्र.82/98/सेवा-5 दि. 11 डिसेंबर 1998 (स्पष्टीकरण-शासन परिपत्रक क्रमांक घभाभ-1098/सीआर-62/एसईआर-5 दि. 15 फेब्रुवारी 1999)

03 शासन निर्णय, वित्त विभाग, क्र. घभाभ-1015/प्रक्र.19/सेवा-5 दि. 16 डिसेंबर 2016

04 UGC विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचे परिपत्रक क्र. F-3-2/2015 (Admin I/A & B) दि. 06 ऑक्टोबर 2015

05 महाराष्ट्र शासनाचे Notification URT/1194/149/94, UNI-3 दि. 07 सप्टेंबर 1994

06 विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांचा आदेश क्र. F-9-9/1994(CPP-I) दि. 19 मे 1998

07 वित्त मंत्रालया, केंद्र शासन यांचे परिपत्रक दि. 27 नोव्हेंबर 1965

08 शासन निर्णय क्रमांक घभाभ-1090/प्रक्र10/सेवा-5 दि. 05 फेब्रुवारी 1990

09 शासन निर्णय क्रमांक सीपीए-1484/सीआर-1275/एशईआर-5 दि. 20 सप्टेंबर 1984

सभेमध्ये उपरोक्त सर्व शासननिर्णयाच्या / परिपत्रकाच्या अनुषंगाने घरभाडेभत्ता हा ज्या शहरात विद्यापीठ आहे त्याच शहराचा लागु होईल असे स्पष्ट नमुद असल्याने व सदर विद्यापीठ स्वयंअर्थसहायित (Self Finance) असून आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार मा. व्यवस्थापन मंडळाला आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन व्यवस्थापन मंडळाने शहरीकरणाच्या दराने घरभाडे भत्ता चालू ठेवण्यात यावा. तसेच यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय, मुंबई यांचेकडे पत्रव्यवहार करावा. याबाबतीत मा. व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयाप्रमाणे शासनास कळविण्यात यावे, असे सर्वानुमते ठरले.

187.3.13 आस्थापना कक्ष

**विद्यापीठातील गट – 'अ' संवर्गातील पदोन्नतीबाबत गठित समितीवर मा. व्यवस्थापन मंडळ सदस्याची नियुक्ती करणेबाबत...**

**[टिपणी** – विद्यापीठातील खातेंतर्गत पदोन्नतीसाठी विद्यापीठ अध्यादेश क्र. 18 (8/1993) नुसार कार्यपद्धती विशद करण्यात आली असून अध्यादेशातील अ.क्र. 3(c) नुसार 'अ' गटातील पदोन्नतीकरीता खालीलप्रमाणे समिती गठित करण्यात आलेली आहे.

1. Vice-Chancellor - अध्यक्ष
2. An Executive Director to be nominated By the Vice-Chancellor - सदस्य
3. The Director/Head/Manager of the centre/ Division/School concerned - सदस्य
4. A representative of SC/ST or OBC to be Nominated by the Vice-Chancellor - सदस्य
5. Registrar - सदस्य सचिव

दिनांक 29 ऑगस्ट, 2022 व्यवस्थापन मंडळ विषय क्र. 184.3.4 वर विचार विनिमय दरम्यान मा. व्यवस्थापन मंडळाचे सदस्य डॉ. सत्यकाम यांनी यापुढे गट – 'अ' संवर्गातील पदोन्नतीबाबतची कार्यवाही करतांना खातेंतर्गत पदोन्नती समितीवर मा. व्यवस्थापन मंडळातून एका सदस्याची नियुक्ती करण्यात यावी अशी सूचना मांडली. खातेंतर्गत पदोन्नती समिती विद्यापीठाच्या अध्यादेश क्र. 18(8/1993) नुसार गठित करण्यात येते, यात मा. व्यवस्थापन मंडळातून एका सदस्याची नियुक्तीची तरतूद करावयाची असल्यास अध्यादेश दुरूस्ती करावी लागेल.

अध्यादेश तयार करण्याची तरतूद परिनियम क्र. 10 (8 of 1992) मध्ये नमूद केल्यानुसार प्रथम अध्यादेशास मा. कुलपती यांची मान्यता असल्यास त्यातील दुरूस्ती (Amendment) व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने करता येईल अशी तरतूद आहे.

यापूर्वी मा. व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. ए-100/09/114 दिनांक 06.11.2009 नुसार विद्यापीठ कायद्यातील बदलानुसार असलेल्या स्टॅट्युट व ऑर्डीनन्स इत्यादी मध्ये सुधारणा व नविन स्टॅट्युट व ऑर्डिनन्स तयार करणेकरिता समिती गठित करण्यात आली होती. परंतु सदर समितीचे पुढे कामकाज झालेले दिसून येत नाही.

अध्यादेश बदल, दुरूस्त्या व नव्याने अध्यादेश तयार करणे याबाबतची कार्यवाही करण्यासाठी

| | | |
|---|---|---|
| | | व्यवस्थापन मंडळ ठराव क्र. ए-100/09/114 दिनांक 06.11.2009 नुसार समितीचे नव्याने गठन करावे किंवा नवीन वेगळे सदस्य घेऊन समिती गठित करावी किंवा कसे याबाबतचा विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे विचारार्थ व निर्णयार्थ सादर...]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** विद्यापीठातील उपरोक्त पदोन्नतीसंदर्भातीलअध्यादेशात व्यवस्थापन मंडळाच्या सदस्यांचा समावेश करणेसाठी अध्यादेशात बदल करणे आवश्यक आहे. तसे करतांना सध्या अस्तित्वात असलेल्या परिनियम आणि काही अध्यादेशांमध्ये बदल, दुरूस्त्या व नव्याने तयार करणे याबाबत मा. कुलगुरू यांच्या मान्यतेने माजी सेवानिवृत्त कुलगुरू यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित करावी, समितीतील इतर सदस्यांचा समावेश करण्यासाठी मा. कुलगुरू यांना नामनिर्देशनाचे अधिकार द्यावेत असे सर्वानुमते ठरले . |
| | 187.3.14<br>वित्त<br>विभाग | **दि. 22 नोव्हेंबर 2022 रोजी झालेल्या वित्त समितीच्या बैठकीचे इतिवृत्त व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेस्तव सादर...**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** - दि. 22 नोव्हेंबर 2022 रोजी झालेल्या वित्तसमितीच्या बैठकीच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा होऊन सर्वानुमते सदर इतिवृत्ताची नोंद घेऊन त्यास अंतिम मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 187.3.15<br>वित्त<br>विभाग | **दि. 22 नोव्हेंबर 2022 च्या वित्त समितीने 2022-23/3.4 ठरावानुसार केलेली शिफारस : - विद्यापीठाचे लेखा परीक्षण शासन नियुक्त संवैधानिक लेखा परीक्षकाकडून करण्याच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियमात दुरुस्ती सुचविणेचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळाच्या मान्यतेने शासनाकडे पाठविण्यास्तव सादर...**<br>**[टिपणी** – विद्यापीठाचे लेखापरीक्षण शासन नियुक्त संवैधानिक लेखा परीक्षकाकडून करण्याच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियमातील कलम 27(2) मध्ये दुरूस्ती करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणे. इतर विद्यापीठांना लागू असलेला महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा 2016 मधील कलम 135(2) प्रमाणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळाला विद्यापीठाने संवैधानिक लेखा परीक्षक नेमण्याचा अधिकार असावा अशी दुरूस्ती सुचविणेचा प्रस्तावास वित्त समितीने 2022-23/3.4 ठरावानुसार शिफारस केलेली असल्यामुळे सदर सूचना शासनास पाठविण्याच्या मान्यतेस्तव सदर विषय व्यवस्थापन मंडळाच्या निर्णयार्थ सादर....]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** दि. 22 नोव्हेंबर 2022 च्या वित्त समितीने 2022-23/3.4 ठरावानुसार विद्यापीठाचे लेखा परीक्षण शासन नियुक्त संवैधानिक लेखा परीक्षकाकडून करण्याच्या अनुषंगाने यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियमात 27(2) मध्ये दुरुस्ती सुचविणेचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 187.3.16<br>वित्त विभाग | **दिनांक 21 फेब्रुवारी 2023 च्या वित्त समितीच्या सभेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** दिनांक 21 फेब्रुवारी 2023 च्या वित्त समितीच्या इतिवृत्तावर सविस्तर चर्चा होऊन इतिवृत्ताची नोंद घेऊन मान्य करण्यात आले. इतिवृत्तातील खालील विषयाच्या अनुषंगाने सविस्तर चर्चा होऊन वित्त अधिकारी यांनी बैठकीत सादरीकरण केले.<br>**01.** आर्थिक वर्ष 2022-23 चा सुधारित व सन 2023-24 या वर्षाच्या अर्थसंकल्पाचे सादरीकरण झाल्यानंतर त्यावर सविस्तर चर्चा होऊन सदर अर्थसंकल्पास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली.<br>**02.** आर्थिक वर्ष 2021-22 या वर्षाच्या अंकेक्षण अहवालावर सविस्तर चर्चा होऊन त्यास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 187.3.17<br>आस्थापना<br>कक्ष | **महाराष्ट्र शासन यांनी विद्यापीठांतर्गत सुरू केलेल्या सेंटर फॉर डीसॅबिलिटीज स्टडीज या केंद्रासाठी पद निर्मितीच्या शासन निर्णयाबाबत...**<br>**[टिपणी** – शासन निर्णय क्र. संकीर्ण – 2207/प्र.क्र. 120 /विशि-1 दि. 19 सप्टेंबर 2022 नुसार महाराष्ट्र शासनाने विद्यापीठातील सेंटर फॉर डीसबिलीटीज स्टडीज या केंद्रासाठी सहयोगी प्राध्यापक 01 पद (एकत्रित मानधनावर)– रु. 50,000/- व सहायक प्राध्यापक 05 पदे (एकत्रित मानधनावर)– रु. 30,000/- प्रत्येकी अशी एकूण 06 पदे 05 वर्षाच्या कालावधीसाठी निर्माण करण्यास मान्यता दिलेली आहे. या शासन निर्णयाप्रमाणे कार्यवाही करण्यासाठी सदरचा विषय व्यवस्थापन मंडळापुढे निर्णयार्थ सादर.... ]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** महाराष्ट्र शासन यांनी विद्यापीठांतर्गत सुरू केलेल्या सेंटर फॉर डीसॅबिलिटीज स्टडीज या केंद्रासाठी करारावरील पद निर्मितीच्या शासन निर्णयाची नोंद घेण्यात आली |

| | | |
|---|---|---|
| | | व सलग 5 वर्षासाठी नियुक्तीची तरतूद विद्यापीठ परिनियमात नसल्याने सध्या करारावरील नियुक्तीसाठी अस्तित्वात असलेल्या परिनियमानुसार तसेच कायद्यातील तसेच याबाबतच्या शासननिर्णयातील तरतुदीनुसार करारावर सदर नियुक्त्या करण्यास मान्यता देण्यात आली. सदर बाब शासनास कळविण्यात यावी असे ठरले. |
| | 187.3.18<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील नियमित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 10,20,30 वर्षानंतर मिळणाऱ्या तीन लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविणेस व्यवस्थापन मंडळाची मान्यता मिळणेबाबत...**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** विद्यापीठातील नियमित शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना 10,20,30 वर्षानंतर मिळणाऱ्या तीन लाभाची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना लागु करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 187.3.19<br>परीक्षा नियंत्रक | **श्रीमती प्रतिभा प्रल्हाद पवार (बी.एड. तुकडी 2002-2004) या विद्यार्थीनीच्या प्रवेशातील त्रुटींमुळे तिचा निकाल रद्द करणे किंवा कसे याबाबत विद्वत परिषद ठराव क्र. 60.3.2 अन्वये केलेली शिफारस व्यवस्थापन मंडळाच्या विचारार्थ व निर्णयार्थ सादर...**<br>[**टिपणी** श्रीमती प्रतिभा प्रल्हाद पवार (बी.एड. तुकडी 2002-2004) या विद्यार्थीनीच्या प्रवेशातील त्रुटींमुळे तिचा निकाल रद्द करावा किंवा कसे याबाबतचा विषय परीक्षा मंडळ बैठक क्र. 39, दिनांक 3/8/2021 मध्ये क्र. 39.04.04 अन्वये मांडण्यात आला होता.<br>तत्कालीन बी.एड. प्रवेश समितीने श्रीमती प्रतिभा प्रल्हाद पवार यांची कागदपत्रे तपासून प्रवेश निश्चित केला होता. त्यानुसार श्रीमती प्रतिभा पवार यांनी परीक्षा ही दिलेली आहे. यासंदर्भात परीक्षा मंडळाने सदर प्रकरणी झालेला कालापव्यय पाहता श्रीमती पवार यांचा बी.एड. परीक्षेचा निकाल रद्द करू नये असा प्रस्ताव विचारार्थ व निर्णयार्थ विद्वत परिषदेसमोर सादर केला होता. विद्वत परिषदेने परीक्षा मंडळाच्या शिफारशीवर विचार विनिमय करून ही शिफारस मा. व्यवस्थापन मंडळाकडे विचारार्थ सादर करावी असा ठराव सर्वानुमते पारीत केला आहे. यानुसार विद्वत परिषदेची शिफारस व्यवस्थापन मंडळापुढे विचारार्थ सादर...]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** श्रीमती प्रतिभा प्रल्हाद पवार (बी.एड. तुकडी 2002-2004) या विद्यार्थीनीच्या प्रवेशास बराच कालावधी उलटला आहे. याबाबत परीक्षा मंडळ व विद्वत परिषदेने त्यांच्या प्रवेशातील त्रुटींमुळे तिचा निकाल रद्द करू नये अशी केलेली शिफारस सर्वानुमते मान्य करण्यात आली. |
| | 187.3.20<br>वित्त विभाग | **आर्थिक वर्ष 2022-23 मधील- वित्त समितीच्या 05 व्या सभेचे इतिवृत्त मान्यतेस्तव सादर...**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** आर्थिक वर्ष 2022-23 मधील दिनांक 27 मार्च 2023 रोजीच्या वित्त समितीच्या 05 व्या सभेचे इतिवृत्तावर सविस्तर चर्चा होऊन त्यातील खालील विषयाच्या अनुषंगाने निर्णय घेण्यात आले.<br>01 शुल्क निर्धारण समितीने सादर केलेल्या अहवालावर सविस्तर चर्चा होऊन शुल्क वाढीच्या अनुषंगाने विद्यापीठाने घेतलेला निर्णय अत्यंत योग्य असून महसुली तुट भरून काढणेकरिता महसुली उत्पन्नात वाढ होणे आवश्यक आहे. सदर अहवालातील निश्चित झालेल्या शुल्का व्यतिरिक्त इतर राहून गेलेल्या शुल्कशिर्षात मा. कुलगुरुंच्या अधिकारात अंतिम करण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले. सदर शुल्कवाढ ही आर्थिक वर्ष 2023-24 पासून लागु राहील.<br>02 इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विद्यापीठ, नवी दिल्ली यांच्या अध्ययन साहित्य वापराच्या अनुषंगाने गठीत समितीने निश्चित केलेल्या रकमेची अदायगी दि. 31 मार्च 2023 पूर्वी करण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली व विद्यापीठाचे या प्रकरणात रु. 185 लक्ष बचत झाली याबद्दल समिती अध्यक्ष डॉ अनिल कुलकर्णी, सदस्य डॉ. गोविंद कतलाकुटे, श्री. माधव पळशीकर यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करण्यात आला.<br>03 विद्यापीठाच्या वित्त विभागास Accounting ERP व Online Fees collection Systeem with Automated Accounting या सॉफ्टवेअरचे आज रोजी मा. व्यवस्थापन मंडळाच्या सभेमध्ये सादरीकरण होऊन रितसर उद्घाटन होऊन सदर सॉफ्टवेअर आर्थिक वर्ष 2023-24 पासून प्रत्यक्षात अंमलात आणण्यास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. तसेच मा. कुलगुरू महोदय व सन्माननीय सदस्य यांनी वित्त अधिकारी व सर्व कर्मचारी यांनी या सॉफ्टवेअरच्या अंमलबाजवणीसाठी केलेले प्रयत्नास शुभेच्छा देऊन अभिनंदन केले.<br>उपरोक्त प्रमाणे वित्त समितीच्या सभा क्र. 05 च्या इतिवृत्तास सर्वानुमते मान्यता प्रदान करण्यात आली. |

187.3.21 अंतर्गत गुणवत्ता व आश्वासन केंद्र

**अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राने सन 2021-22 चा Annual Quality Assurance Report (AQAR) NAAC ला ऑनलाईन सादर केलेला आहे. त्यास मा. व्यवस्थापन मंडळाची कार्योत्तर मान्यतेसाठी सादर...**

**[टिपणी** - अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राने सन 2021-22 चा Annual Quality Assurance Report (AQAR) NAAC ला ऑनलाईन पद्धतीने दि. 29 डिसेंबर 2022 रोजी सादर केलेल्या रिपोर्टला कार्यात्तर मान्यतेसाठी सादर...]

**व्यवस्थापन मंडळ ठराव** – दिनांक 29 डिसेंबर 2022 रोजी अंतर्गत गुणवत्ता आश्वासन केंद्राने NAAC ला सादर केलेल्या सन 2021-22 चा Annual Quality Assurance Report (AQAR) ला कार्योत्तर मान्यता देण्यात आली.

187.3.22 आस्थापना कक्ष

**श्रीम. प्रतिक्षा अर्जुन बोडके संयोजक (शैक्षणिक) मूल्यमापन विभाग यांना एक वर्ष मुदतवाढ देणेबाबत...**

**[टिपणी** – श्रीम. प्रतिक्षा अर्जुन बोडके यांची 11( 2 of 1993) नुसार मा. कुलगुरू यांच्या अधिकारात 2 वर्षांसाठी नियुक्ती देण्यात आली होती. यांना पुढील एक वर्षासाठी नियुक्ती देण्याकरिता सदर विषय मा. व्यवस्थापन मंडळापुढे निर्णयार्थ सादर....]

**व्यवस्थापन मंडळ ठराव** - श्रीम. प्रतिक्षा अर्जुन बोडके यांची 11( 2 of 1993) नुसार मा. कुलगुरू यांच्या अधिकारात 2 वर्षांसाठी नियुक्ती देण्यात आली होती. यांना व्यवस्थापन मंडळाच्या अधिकारातील पुढील एक वर्षासाठी नियुक्ती देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

**मा. अध्यक्षांच्या परवानगीने ऐनवेळचे विषय**

187.4.1 आस्थापना कक्ष

**विद्यापीठाच्या आकृतीबंधात कृषी विज्ञान केंद्रांच्या 04 पदांचा समावेश करणेबाबत...**

**टिपणी** –1. विद्यापीठात 1994 पासून भारतीय कृषि अनुसंधान केंद्राच्या (ICAR) मान्यतेने "कृषी विज्ञान केंद्र" मंजूर असून यासाठी 16 पदे ICAR ने मंजूर केली आहेत. त्यापैकी 15 पदे भरलेली आहेत. सदर पदांवर प्रशासकीय व वित्तीय नियंत्रण विद्यापीठाचे असते, मात्र या पदांचे वेतन ICAR कडून प्राप्त होते.

2. सन 2004 पर्यंत 16 पैकी 12 पदे भरण्यात आलेली असल्याने त्यावेळी विद्यापीठाने कृ.वि.केंद्रासाठी ICAR कडून 16 पदे मंजूर असतांना 12 पदे दि. 6 ऑगस्ट, 2004 च्या शासन निर्णयानुसार भविष्यात ICAR ने वेतन देणे बंद केल्यास त्याचा वेतनाचा खर्च विद्यापीठ निधीतून करावा या अटीच्या अधीन राहून रकाना क्र. 6 मध्ये नमुद केल्यानुसार महाराष्ट्र शासनाने विद्यापीठ आस्थापनेवर मंजूर केली आहेत

| अ. क्र. | पदाचे नांव | ICAR मान्य पदे | वेतनश्रेणी | भरलेली पदे | शासन मान्य पदे |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| 01 | ट्रेनिंग ऑर्गनयझर | 01 | 131400-217100 | 01 | 01 |
| 02 | ट्रेनिग असोसिएट (SMS) | 06 | 56100-177500 | 05 | 04 |
| 03 | फार्म मॅनेजर | 01 | 35400-112400 | 01 | 01 |
| 04 | अधिक्षक नि लेखापाल | 01 | 35400-112400 | 01 | 01 |
| 05 | प्रोग्राम असिस्टंट (कृषि-1,संगणक-1) | 02 | 35400-112400 | 02 | 00 |
| 06 | कनिष्ठ लघुलेखक | 01 | 25500-81100 | 01 | 01 |
| 07 | वाहनचालक | 02 | 21700-69100 | 02 | 02 |
| 08 | परिचर | 02 | 15000-47600 | 02 | 02 |
| | **एकुण** | **16** | | **15** | **12** |

3. वरील तक्यातील अ.क्र. 2 आणि 5 मधील ट्रेनिग असोसिएट (SMS) -02 पदे आणि प्रोग्राम असिस्टंट -02 पदे अशी एकुण 04 पदे महाराष्ट्र शासनाकडून विद्यापीठ आस्थापनेवर मंजूर केलेली नाहीत.

4. विद्यापीठाचा आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनाकडे सादर करणे बाकी आहे. यांत काही पदे नव्याने शासनाच्या मंजूरीसाठी प्रस्तावित करावयाची आहेत. सदर आकृतीबंधाच्या

| | | |
|---|---|---|
| | | शासनाकडे पाठवावयाच्या प्रस्तावात कृषि विज्ञान केद्रातील मुद्दा क्र. 3 मध्ये नमुद केलेल्या 04 पदांचा समावेश करून शासनाकडे मान्यतेसाठी सादर करण्याची संबंधित कर्मचाऱ्यांची मागणी आहे.<br>संबंधित कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार मुद्दा क्र. 2 मध्ये नमुद केलेल्या अटीच्या अधीन राहून सदर प्रस्तावित 04 पदे विद्यापीठ आस्थापनेवर मंजूर करून घेणेकरीता शासनाकडे प्रस्तावित करण्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर करण्यात येत आहे.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव -** सन 2004 पर्यंत 16 पैकी 12 पदे विद्यापीठ आस्थापनेवर शासनाने मंजूर केली आहेत. उर्वरित 4 पदे ( ट्रेनिग असोसिएट (SMS) -02 पदे आणि प्रोग्राम असिस्टंट -02 पदे ) विद्यापीठ आस्थापनेवर मंजूर करणेसाठी आकृतीबंधाच्या प्रस्तावासोबत शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. यास यापूर्वी 2014 मध्ये या ठराव क्र. A-100/14/60 नुसार ठरावास मान्यता देण्यात आलेली होती. याची सर्व सन्माननीय सदस्यांनी नोंद घेतली. |
| | 187.4.2<br>**Entrepreseurship Cell** | **विद्यापीठात Entrepreseurship Cell Expenditure हे नव्याने लेखाशिर्ष तयार करून त्यास तरतूद उपलब्ध करण्यास मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव सादर**<br>**[टिपणी -** विद्यापीठाचे Entrepreseurship Cell हे कार्यालय नव्याने सुरू करण्यात आले आहे. या कार्यालयामार्फत विद्यापीठात बैठकांसाठी निमंत्रित नवउद्योजक व Industry Experts व TPO यांच्या बैठका, महाराष्ट्र आणि महाराष्ट्रा बाहेरील काही Entrepreseurship आणि ट्रेनिंग संस्थांची मेंबरशिप घेणे या अनुषंगाने येणारी सर्व कामे त्यासाठी येणाऱ्या वित्तीय बाबी करण्यासाठी लेखाशिर्षात तरतूद असणे आवश्यक असल्याने Entrepreseurship Cell - Expenditure करिता लेखाशिर्ष उपलब्ध करून देणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळासमोर मंजुरीस्तव सादर....]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव –** विद्यापीठ Entrepreseurship Cell Expenditure करिता स्वतंत्र लेखाशीर्ष व या लेखाशीर्षासाठी आर्थिक वर्ष 2023-24 च्या अंदाजपत्रकात तरतूद करणेस मान्यता देण्यात आली. |
| | 187.4.3<br>आस्थापना कक्ष | **दृक-श्राव्य केंद्रातील अधिकारी आणि कर्मचारी यांना तदर्थ पदोन्नतीचा योजना लागू करणेबाबत....**<br>**[टिपणी -** विद्यापीठातील दृक-श्राव्य केंद्रातील पदांना नेमणुकीपासून पदोन्नतीची संधी उपलब्ध नसल्यामुळे शासन निर्णयानुसार सरळ सेवेच्या रिक्त पदांवर तदर्थ पदोन्नती देण्याबाबत कर्मचाऱ्यांची मागणी असून सदरचे विषय व्यवस्थापन मंडळासमोर विचारार्थ सादर....]<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव-** विद्यापीठातील दृक-श्राव्य केंद्रातील पदांना नेमणुकीपासून पदोन्नतीची संधी उपलब्ध करून देण्याकरीता मसुदा परिनियमास मा. महामहिम राज्यपाल यांनी संमती दिलेली आहे. या परिनियमानुसार पदोन्नतीच्या कोट्यातील पदांवर पदोन्नतीची कार्यवाही करण्यास याच बैठकीतील ठराव क्र. 187.3.10 अन्वये कार्यवाही करण्यास मान्यता दिलेली आहे. संबंधित कर्मचाऱ्यांच्या मागणीनुसार दृकश्राव्य केंद्रातील सरळसेवेच्या कोट्यातील पदांवर तदर्थ पदोन्नती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 187.4.4 | **व्यवस्थापन मंडळ सदस्य यांना अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत...**<br>विद्यापीठाच्या कामाची कार्यपद्धती व शासन कार्यपद्धती याची सांगड घालण्याच्या उद्देशाने विविध शासकीय व केंद्रीय कार्यालये येथे कसे कामकाज चालते याबाबतची माहिती घेण्यासाठी व प्रलंबित प्रस्तावाचा पाठपुरावा करण्यासाठी नवी दिल्ली येथे व्यवस्थापन मंडळ सदस्यांचा अभ्यासदौरा आयोजित करण्याबाबत साधक बाधक चर्चा करण्यात आली. मा. कुलगुरूंच्या संमतीने अभ्यास दौरा आयोजित करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले. |

| | | |
|---|---|---|
| | 187.4.5 | **वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी विद्यापीठाच्या वित्त विभागात नव्याने संगणकप्रणाली लागु करणे, विद्यापीठाच्या आर्थिक शिस्तीतील उणिवा निदर्शनास आणून त्यावर उपाययोजना सुचविणे, शैक्षणिक व प्रशासकीय सुसुत्रता आणण्यासाठी अर्थसंकल्पाचे पुनर्गठन करून या सर्व बाबींचे सादरीकरण मा. व्यवस्थापन मंडळासमोर करून विद्यापीठाच्या आर्थिक बचतीसाठी नवीन संकल्पना मांडल्या त्याबद्दल त्यांच्या अभिनंदनाचा ठराव पारित करणेबाबत.**<br>**ठराव :** वित्त अधिकारी डॉ. गोविंद कतलाकुटे यांनी विद्यापीठाच्या वित्त विभागात घेतलेल्या सॉफ्टवेअरच्या व 2023-24 चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकाचे केलेले सादरीकरण तसेच वित्तीय शिस्तीच्या अनुषंगाने केलेल्या उपाययोजनांचे मा.व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीमध्ये केलेल्या सादरीकरण अत्यंत उत्कृष्ट व आर्थिकशिस्तीच्या अनुषंगाने अत्यंत महत्वाचे आहे. तसेच डॉ. कतलाकुटे यांनी विद्यापीठात अनेक वित्तीय पध्दती राबविल्याने विद्यापीठाची आर्थिक बचत झाली आहे. (उदा. संपत्तीवर घसारा आकारणी, भांडवली खर्च करण्याची आवश्यकता निदर्शनास आणणे, चालु बँक खाती बंद करून सर्व व्यवहार बचत खात्यावरून सुरु केले, अंकेक्षणातील परिच्छेद निरंक करण्यासाठी हाती घेतलेलाप्रकल्प, अग्रीम खाते व सस्पेन्स खात्यावरील रकमाचे समायोजन, बँक खात्याचे ताळमेळ घालण्याचे कार्य इत्यादी अनेकबाबी) त्यामुळे मा. व्यवस्थापन मंडळाचे सन्माननीय सदस्य डॉ. महेंद्र लामा व मा. आमदार श्रीमती सरोज अहिरे यांनी त्यांच्या अभिनंदनाचा ठरावमांडला. त्यास डॉ. अनिल कुलकर्णी यांनी अनुमोदन दिले व मा. अध्यक्ष तथा कुलगुरू व इतर सर्व सन्माननीय सदस्यांनी सदर ठरावास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| | 187.4.6 | **नविन शैक्षणिक धोरण – 2020 नुसार विद्यापीठातील प्रवेशित प्रत्येक विद्यार्थ्यांचे Abc - ॲकेडेमिक बँक ऑफ क्रेडीट्स खाते तयार करणे आवश्यक होते. त्यात आपल्या विद्यापीठाचा संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक आला त्याबाबत व्यवस्थापन मंडळ सन्माननीय सदस्यांनी अभिनंदनाचा ठराव करावा असे सुचविले.**<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव** – सन्माननीय सदस्य डॉ. महेंद्र लामा यांनी सूचविलेला अभिनंदनाच्या ठरावावर चर्चा करून परीक्षा नियंत्रक, परीक्षा विभाग व विभागीय केंद्रावरील विद्यापीठाचे सर्व कर्मचाऱ्यांचा अभिनंदनाचा ठराव मंजूर करण्यात आला. |
| | 187.4.7<br>वाणिज्य व्यवस्थापन विद्याशाखा | **एम.बी.ए. शिक्षणक्रमास AICTE ची मान्यता घेण्याबाबत कागदपत्रांची पूर्तता करणेस मान्यता मिळणेबाबतचा प्रस्ताव व्यवस्थापन मंडळापुढे मान्यतेस्तव सादर....**<br>**[टिपणी** – 2023-24 या शैक्षणिक वर्षापासून एम.बी.ए. शिक्षणक्रमास AICTE ची मान्यता घेण्याकरिता आवश्यक त्या शैक्षणिक व प्रशासकीय बाबींची पूर्ततेबाबतचा विषय व्यवस्थापन मंडळासमोर सादर...<br>व्यवस्थापन मंडळ ठराव - AICTE 2023-24 – Approval Process Handbook (APH 2023-24) नुसार एम.बी.ए. शिक्षणक्रमास AICTE ची मान्यता घेण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |
| | 187.4.8<br>आस्थापना कक्ष | **विद्यापीठातील 41 कर्मचाऱ्यांच्या वयोधिक्य, नेमणूक कार्यपद्धतीमधील अनियमितता शिथील करणेबाबत...**<br>**[ टिपणी** – विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांमधील अनियमिततेसंदर्भात एकूण 68 प्रकरणांवर निर्णय देतांना उच्च व तंत्रशिक्षण विभागाने विधी व न्याय विभागाचे मत मागवून त्यानुसार शासनाच्या 13 ऑगस्ट 2019 आणि मा. संचालक उच्च शिक्षण विभाग यांच्या 17 सप्टेंबर 2019 च्या पत्रान्वये 68 प्रकरणांतील अनियमितचा शिथिल करण्याचे अधिकार विद्यापीठाच्या व्यवस्थापन मंडळास दिलेले आहेत. या प्रकरणांचा निपटारा करणेकामी सध्या खालीलप्रमाणे समिती गठित केलेली आहे.<br>1. डॉ. अनिल कुलकर्णी, व्यवस्थापन मंडळ सदस्य<br>2. श्री. भटूप्रसाद पाटील, कुलसचिव (प्र)<br>3. उपकुलसचिव, आस्थापना कक्ष<br>4. सहायक कुलसचिव, आस्थापना कक्ष<br>सदर समितीने आतापर्यंत 27 प्रकरणांचा निपटारा केलेला असून 27 प्रकरणांशी संबंधित |

| | | |
|---|---|---|
| | | कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन प्रकरणे मार्गी लागलेले आहे. कारण यापूर्वी संबंधित वर्षात जेवढे कर्मचारी सेवानिवृत्त होतील तेवढ्या कर्मचाऱ्यांची प्रकरणे समितीने तपासून शिफारशी कराव्यात व त्यास व्यवस्थापन मंडळाची मान्यता घेतल्यानंतर सेवानिवृत्ती प्रकरण व्यवस्थापन मंडळाच्या ठरावासह शासनाकडे पाठवावेत अशी कार्यवाही केली जात होती.<br>परंतू शासनाने 68 प्रकरणांपेकी उर्वरित 41 प्रकरणे व्यवस्थापन मंडळाच्या बैठकीत एकाच वेळी ठेवून व्यवस्थापन मंडळाचा ठराव करून शासनाकडे पाठवावे असे सूचित केले आहे. त्यानुसार 41 प्रकरणांसंदर्भातील शिफारशी व्यवस्थापन मंडळापुढे सादर करण्यासाठी समितीच्या विस्ताराची बाब व्यवस्थापन मंडळ सदस्य डॉ. अनिल कुलकर्णी यांनी मांडली असून सदर विषय व्यवस्थापन मंडळ पुढे सविनय सादर.<br>**व्यवस्थापन मंडळ ठराव :** उर्वरित 41 प्रकरणांसदर्भात आवश्यक सर्व कागदपत्रे तपासून शिफारस करणेसाठी समितीचा विस्तार करून समितीत डॉ.व्ही.एन. मगरे,कलगुरू – प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकलसायन्सेस, लोणी, अहमदनगर आणि ॲड. सुनिता लाड - विद्यापीठ कायदेशीर सल्लागार या दोन सदस्यांचा समावेश यापूर्वीच्या समितीमध्ये करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

मा.कुलगुरू तथा अध्यक्ष व्यवस्थापन मंडळ यांच्या परवानगीने बैठक संपन्न झाल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

**सचिव**
**व्यवस्थापन मंडळ**

**कुलगुरू तथा अध्यक्ष**
**व्यवस्थापन मंडळ**